## मराठी मासिकात नव्या प्रथा सुरू करणारे

# 'मासिक मनोरंजन'कार कै. का. र. मित्र

मराठी भाषेमध्ये प्रत्यही नवनवीन मासिके निघत आहेत. या सर्वच मासिकांचे संपादक साहित्यिक असतात असे नाही, त्याचप्रमाणे सर्वांनाच साहित्यात रुची असते असे मानायलाही जागा नाही. परंतु पूर्वीपेक्षा साक्षरता वाढल्यामुळे आणि निरनिराळ्या कंपन्यांतून मिळालेल्या छोट्या छोट्या फिरत्या भांडवलामुळे ही मासिके छपतात. मासिक काढणे आणि चालवणे हा आजकाल साहित्यसेवेपेक्षा धंदा झाला आहे.

परंतु सुमारे सत्तर वर्षांपूर्वी साक्षरतेचे प्रमाण आजच्याइतके नसताना शिक्षकाच्या पेशात संसाराचा गाडा हाकणे शक्य नाही म्हणून मासिकाकडे [illegible] लागेल. हे धाडस कै. काशिनाथ रघुनाथ मित्र यांनी त्यावेळी केले आणि सतत पंचवीस वर्षे प्रयत्न करून ते यशस्वी झाले.

सावंतवाडी तालुक्यातील आजगाव या आपल्या मूळगावाहून वयाच्या तेविसाव्या वर्षी, १८९१ मध्ये एक तरुण नशीब काढण्यासाठी मुंबईत आला. आणि अंगच्या चिकाटीने आणि हुशारीने आपले नाव मराठी वाङ्मयाच्या इतिहासात अजरामर करून गेला. तो तरुण म्हणजेच कै. का. र. मित्र।

कै. काशिनाथपंतांनी पुण्यात शिक्षण संपवून काही काळ शिक्षकाचे काम केले होते. परंतु वाङ्मयप्रेम त्यांना स्वस्थ बसू देईना. मुंबईत आल्यावर ते प्रथम बंगाली भाषा शिकले. संसाराला हातभार लागावा म्हणून पुण्यातील करमणुकीच्या धर्तीवर मुंबईमध्ये एक मासिक काढण्याची कल्पना त्यांना सुचली आणि त्यांनी १८९५ मध्ये 'मनोरंजन' नावाचे सोळा पानांचे क्राउन आकाराचे छोटे मासिक काढले. बंगाली वाङ्मयाच्या परिचयामुळे 'मित्र' या बंगाली आडनावाचे काशिनाथपंतांना आकर्षण वाटले आणि त्यांनी आपले सहा अक्षरी 'आजगावकर' हे लांबलचक नाव टाकून त्याऐवजी 'मित्र' हे सुटसुटीत बंगाली नाव स्वीकारले. पुढे काशिनाथ रघुनाथ मित्र या नावानेच ते सर्वत्र ओळखले जाऊ लागले.

'मनोरंजन' या नावाबद्दल थोडीशी कुरकुर ऐकू येताच त्यांनी मासिक मनोरंजन हे रूपांतर करून अल्पावधीतच ते मासिक लोकप्रिय केले.

'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमंते तत्र देवता' हे मनुवचन मासिक मनोरंजनाचे ब्रीदवाक्य होते. सोळा पानाने सुरू झालेल्या या मासिकाची पृष्ठसंख्या अल्पावधीतच शंभरापर्यंत वाढविण्यात आली.

संसारास हातभार लागावा म्हणून मासिकाकडे मित्र वळलेले होते तरी साहित्याबद्दल त्यांना जिव्हाळा होता. एकाग्र ध्येयवाद त्यांच्या ठिकाणी वास करीत होता. मराठी मासिक

**यशवंत जोशी**
**एम.ए.**

इंग्रजी भाषेतील पहिल्या प्रतीच्या सचित्र मासिकाच्या तोडीचे करावयाचा त्यांचा निश्चय होता. मुखपृष्ठ, कागद, छपाई आणि सर्वच अंकभर पसरलेली रंगीबेरंगी चित्रे या बाह्य गोष्टींकडेच त्यांनी लक्ष पुरविले होते असे नव्हे तर छोट्या छोट्या गोष्टी लहानमोठी चरित्रे, क्रमशः प्रसिद्ध होणाऱ्या कादंबऱ्या, सचित्र प्रवास वर्णने, विनोदी चुटके, चुरचुरीत शैलीतील आश्चर्यकारक माहिती इत्यादी अंतरंगाच्या बाबतीतही त्यांनी उच्च पातळी राखली होती. मासिक मनोरंजनात विविधता यावी म्हणून मुंबईतीलच लेखकापुरते मर्यादित क्षेत्र न ठेवता ते दूरदूरच्या लेखकांकडून लेख मागवीत त्यांना प्रत्यक्ष जाऊन भेटत ललित साहित्याबरोबरच ऐतिहासिक, सामाजिक, तात्त्विक वगैरे विषयावरील रंजक लेखही ते मासिक मनोरंजनातून प्रसिद्ध करीत.

दिवाळी अंक, किंवा विशेषांक मराठीत प्रसिद्ध करण्याची मूळ कल्पना मित्रांची. मासिक मनोरंजनाचा १९०९ मध्ये त्यांनी प्रथम खास 'दिवाळी अंक' प्रसिद्ध केला. त्याच्या त्या काळात दहा हजार प्रती हा हा म्हणता संपल्या त्यानंतर मराठीमध्ये दिवाळी अंक व खास विशेषांक प्रसिद्ध होऊ लागले. त्याचप्रमाणे मासिकाच्या वर्गणीदाराला भेट म्हणून एखादे पुस्तक बक्षीस देण्याची प्रथाही मित्रांनीच सुरू केली.

एखाद्या प्रश्नावर निरनिराळ्या पक्षांच्या प्रमुख पुढाऱ्यांची मते मागवून ती क्रमशः प्रसिद्ध करणे आणि समालोचनाचा संपादकीय लेख त्यावर लिहिणे ही पद्धत काशिनाथपंतांनीच सुरू केली. मोठमोठ्या लोकांच्या मुलाखती घेऊन त्या छापण्याचा उपक्रम प्रथम सुरू केला तो मासिक मनोरंजनाने. ही सर्व कामे एकट्या हाती करीत असताना मासिक मनोरंजनाचा अंक वेळच्यावेळी बाहेर पडण्याबद्दलही त्यांचा कटाक्ष असे.

'मासिक मनोरंजना'ची लोकप्रियता इतकी वाढली की महाराष्ट्रातच नव्हे तर भारतात जिथे जिथे म्हणून मराठी माणूस असे तेथे तेथे आणि परदेशातही मराठी माणसाच्या घरात 'मासिक मनोरंजन' जाऊ लागले.

कै. मित्रांनी जिद्दीने 'मासिक मनोरंजन' सतत पंचवीस वर्षे चालविले. कै. हरिभाऊ आपटे आणि कै. वा. म. जोशी यांच्या कादंबऱ्या कै. गुर्जर आणि कै. मोरे यांच्या कथा आणि बालकवी व गोविंदाग्रजांच्या कविता मराठी लोकांनी प्रथम वाचल्या त्या 'मासिक मनोरंजना'तून मराठी नियतकालिकांचा इतिहास 'करमणूक' व 'मासिक मनोरंजन' यांचे स्वतंत्र असे एक युग आहे. त्याचे श्रेय कै. हरिभाऊंप्रमाणेच कै. काशिनाथ रघुनाथ मित्र यांच्याकडेही जाते हे कुणालाही नाकारता येणार नाही.

कै. मित्रांनी मासिक चालवताना संपादक या नात्याने लेखक परिवार जोडला तो त्यांच्या मृत्यूनंतरही मासिक मनोरंजनाशी एकनिष्ठ राहिला. प्रि. भाट्यांनी 'मासिक मनोरंजना'च्या पडत्या काळातही युरोपच्या प्रवासावरील आपले लेख 'मासिक मनोरंजना'कडेच पाठविले होते.

कै. मित्रांनी 'मनोरंजन' नावाचा छापखानाही काढला होता. तोही थोड्याच दिवसात आपल्या छपाईच्या अनुभवाने उच्च दर्जाचा केला.

२० जून १९२० रोजी काशिनाथ रघुनाथ मित्रांनी जगाचा अखेरचा निरोप घेतला, तेव्हा त्यांच्या मित्रांप्रमाणे 'मासिक मनोरंजना'चे असंख्य वाचकही हळहळले त्यांच्या मागे त्यांच्या दोन पदवीधर मुलींनी आणि एका बंधूने १९२२ पर्यन्त 'मासिक मनोरंजन' चालवले. परंतु १९२० नंतर त्याचा दर्जा टिकून राहिला नाही हे खरे।

आज मित्रांची ४६ वी पुण्यतिथी. त्यानिमित्त त्यांच्या स्मृतीस शतशः प्रणाम.

# पीपल्स कॉलेज नांदेडचे घवघवीत यश

नांदेड, दि. १९—मराठवाडा विद्यापीठातर्फे मार्च-एप्रिल १९६६ मध्ये घेतलेल्या विविध परीक्षांचे निकाल हाती आले असून पीपल्स कॉलेजने त्यांत घवघवीत यश मिळविले आहे.

बी. ए. ऑनर्सचा निकाल १०० टक्के लागला आहे.

कु. विद्या पिंगे या मराठवाडा विद्यापीठाच्या बी. ए. परीक्षेत सर्वप्रथम आल्या असून पहिल्या वर्गात विद्यापीठात त्या एकट्या उत्तीर्ण झाल्या आहेत.

श्री. सुभाष बसेकर हे पी. यु. सी. (आर्ट्स)मध्ये तृतीय आले आहेत.

विविध परीक्षांची टक्केवारी खालील प्रमाणे आहे.

पी. यु. सी (आर्ट्स) ५३·५९ पी. यु. सी (कॉमर्स) ४२·५९. बी. कॉम (तृतीय वर्ष) ५५. बी. ए. तृतीय वर्ष (जनरल) ६९. वरील यशामुळे विद्यार्थीवर्गात अत्यंत समाधान पसरले आहे.

**विद्यार्थिनींची खास सोय**

विद्यार्थिनींची सोय करण्याच्या दृष्टीने यंदापासून कॉलेजचे विद्यार्थिनी वसतिगृह [illegible] कोणत्याही महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींना खुले राहील.